महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळ
शासकीय तंत्र निकेतन इमारत, क विभाग, दुसरा मजला,
४९, खेरवाडी, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.
दुरध्वनी - २६४७ ४४ ३५ Website - www.msbve.gov.in Email : chairman-msbve@ nic.in

जा.क्र.मराव्यशिपमं/का-०४/परीक्षा/प्र.का.२०१७-१८/२०१७/ १५२८ दिनांक :- ०८/१०/२०१७

विषय - चलानाची रक्कम न स्वीकारलेल्या संस्थांनी Undertaking सादर करणेबाबत

संदर्भ - या कार्यालयाचे पत्र क्र. मराव्यशिपमं/का-०४/प्र.का.२०१७-१८/मुदतवाढ/२०१७/१३५५, दि. ०७.०९.२०१७

## परिपत्रक -

सर्व संस्थांना याव्दारे कळविण्यात येते की, वरील संदर्भिय पत्रान्वये विद्यार्थी प्रवेशाची अंतिम दिनांक २९/०९/२०१७ तर नोंदणी/परीक्षा शुल्क भरण्याची दिनांक ०५.१०.२०१७ अशी असल्यामुळे सर्व संस्थांनी विद्यार्थी प्रवेशाची सीडी, प्रवेश याद्या, इतर अभिलेख दिलेल्या मुदतीत जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांचेकडे सादर करणे बंधनकारक आहे.

परंतु मंडळाचे भारतीय स्टेट बँकेतील खाते क्र. ३१४८५९९९५० मध्ये तांत्रिक कारणास्तव बऱ्याच संस्थांना विद्यार्थ्यांचे नोंदणी/परीक्षा शुल्क भरणे शक्य झालेले नाही. त्यामुळे ज्या संस्थांचे स्टेट बँकेने नोंदणी/परीक्षा शुल्काचे चलन स्वीकारले नाही याबाबत संस्थांनी Undertaking सादर करावे. बँकेत रक्कम जमा झाल्यानंतर संस्थांनी नोंदणी/परीक्षा शुल्क भरलेल्या चलानाची प्रत जिल्हा कार्यालयास सादर करावी. तथापि सर्व संस्थांनी प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश याद्या/नोंदणी सीडी व इतर अभिलेख विहित मुदतीतच जिल्हा कार्यालयाकडे सादर करणे आवश्यक आहे.

ज्या संस्थांनी दिलेल्या मुदतीत विद्यार्थी नोंदणी सीडी, प्रवेश याद्या जिल्हा कार्यालयास सादर केलेल्या नाहीत अशा संस्थांनी सदर सत्रात प्रवेशत केलेले नाहीत असे गृहित धरून पुढील कार्यवाही करण्यात येईल. तसेच अशा संस्थांमधील विद्यार्थ्यांना परीक्षेला बसता येणार नाही व याबाबतची सर्व जबाबदारी संबधित संस्थेची राहील, याची नोंद घ्यावी.

(डी.ए. दळवी)
सचिव,
म.रा.व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळ,
वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.

प्रत :-

१) जिव्यशिप्रअ कार्यालय, (सर्व) - यांना कळविण्यात येते की, वरीलप्रमाणे सर्व याद्या संस्थांकडून विहित मुदतीत प्राप्त होणेबाबत कार्यवाही होईल याकडे लक्ष द्यावे व सर्व याद्या तपासून विहित मुदतीत सादर होतील याची दक्षात घ्यावी.

२) संगणक विभाग - मंडळाच्या वेबसाईटवर टाकणेसाठी.